## कायम विनाअनुदान तत्वावरील उच्चमाध्यमिक वर्ग परवानगी आदेश

महाराष्ट्र शासन
क्रमांक : एचएससी १७०८/(१८१/०८)(अ)/उमाशि-१.
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २५ जुलै, २००८

प्रति,
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्चमाध्यमिक),
महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय : २००८-२००९ या शैक्षणिक वर्षात नवीन उच्च माध्यमिक इयत्ता ११ वीच्या वर्गास कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्याबाबत...

संदर्भ : १) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-नमाशा २००८/(५४६/०८)/ माशि १, दिनांक ३ जुलै, २००८

२) आपले पत्र क्रमांक- एचएससी/ न.शा.प्र./ २००८-०९/१२ एचएस/, दिनांक २४ जून, २००८ सहपत्रे.

नवीन उच्च माध्यमिक वर्गास परवानगी देण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयास अनुसरुन सोबत जोडलेल्या यादीतील पुणे विभागातील पुणे जिल्ह्यातील संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्यानुसार इयत्ता ११ वी च्या वर्गास सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षापासून कायम विना अनुदान तत्त्वावर शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर संस्थेने माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर नवीन उच्च माध्यमिकचे वर्ग सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

१) या नवीन उच्च माध्यमिक वर्गास शासनाची कायम विनाअनुदान तत्वावर मंजुरी देण्यात येत असून, भविष्यात कधीही अनुदान, तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

२) सदर उच्च माध्यमिक शाळेस शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांचे तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियम अधिनियम, १९७७ व त्याखालील नियमावली १९८१ मधील तरतुदींची काटेकोरपणे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

३) शासनाच्या पूर्वपरवानगीने निश्चित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा अधिक शुल्क विद्यार्थ्यांकडून संस्थेस आकारता येणार नाही.

४) संस्थेच्या अध्यक्षांकडून कायम विनाअनुदान तत्वावर उच्च माध्यमिकचे वर्ग चालविण्यास तयार असल्याबाबतचे शपथपत्र घेऊन संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी स्वतंत्रपणे जतन करून ठेवावे.

Principal
Priyadarshani Junior College of
Arts, Commerce & Science
Bhosari Pune-411039

५) सदर संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

६) "कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी मिळालेली उच्च माध्यमिक शाळा" असा फलक शाळेने ठळक अक्षरात दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा तऱ्हेने लावणे संबंधित संस्थेवर बंधनकारक राहील.

७) सदर "कायम विनाअनुदानित शाळा" अशा प्रकारचे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे.

३. वरीलप्रमाणे परवानगी देण्यापूर्वी या संस्थांबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पूर्तता केल्याची खात्री करुन संबंधित नवीन उच्च माध्यमिक वर्गाची परवानगी देण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करण्यात यावी :-

अ) संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० व संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

ब) सदर संस्थेमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.

क) "कायम विनाअनुदान" तत्वावरील शाळांच्या नोंदवहीत नोंद घेण्यात यावी.

४. विहित शर्तीची व अटींची पूर्तता केल्याची काटेकोरपणे पडताळणी केल्यानंतरच उच्च माध्यमिक वर्गांना परवानगी दिली जाईल याची दक्षता विभागीय शिक्षण उपसंचालकांनी घ्यावी.

५. सदर उच्चमाध्यमिक वर्गांना परवानगी देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करुन त्याबाबतचा अहवाल शासनास त्वरित सादर करण्यात यावा.

६. ज्या संस्थांना राज्य समिती व जिल्हा समिती या दोन्ही समित्यांची शिफारस नसल्यामुळे परवानगी देण्यात आलेली नाही अशा संस्थांना परवानगी दिली नसल्याबाबत आपण आपल्या स्तरावरुन सकारण त्वरित कळवावे व त्याप्रमाणे अनुपालन अहवाल शासनास विनाविलंब सादर करावा.

७. सदर शासन पत्र महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक - २००८०७२५१५०७४९००१ असा आहे.

( म.मा.गोरवे )
कार्यासन अधिकारी.

प्रत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित --

१) विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
२) शिक्षणाधिकारी ( माध्यमिक),जिल्हा परिषद,पुणे
३) मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५) मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा यांचे खाजगी सचिव.
६) मा.राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव.
७) निवड नस्ती (उमाशि १)

Principal
Priyadarshini ... College of
Arts, Commerce & Science
Bhosari Pune-411039

शासन पत्र,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,क्रमांक-एचएससी-१७०८/(१८१/०८)(अ)/उमाशि१
दिनांक २१.०७.२००८ चे सहपत्र

पुणे विभाग

| अ.क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे/महाविद्यालयाचे ठिकाण | मागणी केलेली शाखा | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | कला | विज्ञान | वाणिज्य |
| जिल्हा-पुणे | | | | | |
| १ | हरदेवसिंह बाबा एज्युकेशन सोसायटी, भोसरी, पुणे. | प्रियदर्शनी ज्युनिअर कॉलेज, भोसरी, पुणे. | १ इंग्रजी | १ इंग्रजी | १ इंग्रजी |
| २ | श्री. भास्कराचार्य प्रतिष्ठान, ४४१, नं.३, सिडको, औरंगाबाद | संत ज्ञानेश्वर हायर सेकंडरी स्कूल, खराडी, पुणे १४. | १ इंग्रजी | १ इंग्रजी | -- |
| ३ | महावीर प्रतिष्ठान, पुणे | महावीर इंग्लिश मिडियम स्कूल, सॅलिसबरी पार्क, पुणे | -- | -- | १ इंग्रजी |
| ४ | एशियन ॲकॅडमी ऑफ एज्युकेशन ॲंड रिसर्च, पुणे | एशियन ज्युनि. कॉलेज, नऱ्हे, ता.हवेली | १ इंग्रजी | १ इंग्रजी | १ इंग्रजी |
| ५ | शिवनेरी फाऊंडेशन, आळेफाळा,ता.जुन्नर | डॉ.चंद्रकांत कणसे ज्यु.कॉ.ऑफ आर्टस्,सायन्स अॅण्ड कॉमर्स, खानापूर,जुन्नर | -- | -- | १ इंग्रजी |
| ६ | कुलस्वामी मेडिकल फाऊडेशन आळेफाटा,जुन्नर | डॉ.सौ. सरस्वती कणसे ज्यु.कॉ.ऑफ आर्टस,सायन्स अॅण्ड कॉमर्स,आळेफाटा,ता.जुन्नर | १ इंग्रजी | -- | -- |
| ७ | श्री. भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, लांडेवाडी, आंबेगांव. | डेक्कन मराठी कॉलेज ऑफ कॉमर्स अॅण्ड सायन्स लांडेवाडी, आंबेगांव. | -- | १ इंग्रजी | १ इंग्रजी |
| ८ | जनता शिक्षण संस्था, दापोडी, पुणे | थोपटे इंग्लिश मिडियम हायस्कूल, दापोडी | -- | -- | १ इंग्रजी |
| ९ | सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी, पुणे ४३. | सिंहगड ज्युनिअर कॉलेज, एरंडवणा, पुणे | १ इंग्रजी | १ इंग्रजी | १ इंग्रजी |
| १० | बन्सीलाल रामनाथ आगरवाल चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे. | विश्वकर्मा विद्यालय, इंग्रजी उच्च माध्य. पुणे | १ इंग्रजी | १ इंग्रजी | १ इंग्रजी |
| ११ | सोसायटी ऑफ सेंट उसुर्ला वडगावशेरी, पुणे. | सेंट उसुर्ला हायर सेकंडरी स्कूल, आकुर्डी | -- | १ इंग्रजी | -- |
| १२ | रोझरी एज्युकेशन सोसायटी, पुणे | रोझरी ज्युनिअर कॉलेज, विमाननगर, पुणे | -- | १ इंग्रजी | -- |

तत्सोरते

Principal
Priyadarshani Junior College of
Arts,Commerce & Science
Bhosari Pune-411039

# कायम विना अनुदान तत्वावरील माध्यमिक शाळा परवानगीचे आदेश

## महाराष्ट्र शासन

क्रमांक: नमाशा १००३/(७८४/०३) /माशि-१
शालेय शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२
दिनांक: ९ डिसेंबर, २००३

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक
ठाणे /औरंगाबाद/लातूर/अमरावती/नाशिक /पुणे./नागपूर

विषय:- नवीन माध्यमिक शाळांना कायम विना अनुदान तत्वावर परवानगी देण्याबाबत.

नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयास अनुसरुन सोबत जोडलेल्या सहपत्रातील एकूण (९ ) शैक्षणिक संस्थांना, त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून सन २००२-२००३ व २००३-२००४ या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास या आदेशान्वये शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर संस्थांना माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे.:-

(अ) या नवीन माध्यमिक शाळांना कायम विना अनुदान तत्वावर मंजूरी देण्यात आली असून, भविष्यात कधीही अनुदान, तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

(ब) सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवळी निघणा-या आदेशांचे माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

(क) शासनाच्या पूर्वपरवानगीचे निश्चित केलेले शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारणे संस्थेवर बंधनकारक राहील.

(ड) संस्थेच्या अध्यक्षाकडून कायम विना अनुदान तत्वावर माध्यमिक शाळा चालविण्यास तयार असल्याबाबतचे शपथपत्र घेऊन ते स्वतंत्रपणे जतन करुन ठेवावे.

(इ) सदर संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

(ई) " कायम विना अनुदान तत्वावर परवानगी मिळालेली शाळा " असा फलक अशा शाळेने ठळक अक्षरात दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा त-हेने लावणे संबधित संस्थेवर बंधनकारक राहील.

(फ) सदर कायम विना अनुदानित मान्यता मिळालेल्या संस्थेने संबंधित अधिका-यांशी/ शासनाशी पत्रव्यवहार करतांना " कायम विनाअनुदानित शाळा " अशा प्रकारचे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे.

(ग) सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे (उदा.विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत) काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

(ह) इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेसाठी भविष्यकाळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही या विद्यार्थ्यांच्या फीच्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही. अशा आशायाचे संस्थेच्या अध्यक्षांच्या सहीचे लेखी हमीपत्र संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालकांनी मागवून घेऊन कायम स्वरुपाचे कागदपत्र म्हणून ते सुरक्षितपणे जतन करुन ठेवावे.

३. ही परवानगी देण्यापूर्वी सदर संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पूर्तता केल्याची खात्री करुन,संबंधित नवीन माध्यमिक शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१) संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

२) सदर संस्थे मार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात कोणताही न्यायालयात दावा चालू नाही.

३) " कायम विना अनुदान " तत्वावरील शाळांच्या नोंदवहीत नोंद घेण्यात यावी.

४. विहित शर्तीची व अटींची पूर्तता केल्याची काटेकोरपणे पडताळणी केल्यानंतरच माध्यमिक शाळांना परवानगी दिली जाईल, अशी दक्षता विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी घ्यावी.

५. याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच सदर माध्यमिक शाळेस परवानगी देण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करुन त्याबाबतचा अहवाल शासनास त्वरित सादर करण्यात यावा.

(मा. आ. गुंडे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :माहिती व पुढील कार्यवाहीकरीता अग्रेषित :-
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण),महाराष्ट्र राज्य,पुणे
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे
मा.शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव,
मा.शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
निवड नस्ती,

652 03 17 10 03C:\AAAAA2

सहपत्र

शासनपत्र शालेय शिक्षण विभाग, क्रमांक :नमाशा १००३ /(७८४/२००३)/माशि -१

दिनांक : ९ डिसेंबर, २००३ चे सहपत्र

नवीन माध्यमिक शाळेस कायमविना अनुदान तत्वावर परवानगी द्यावयाच्या संस्थांची यादी

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | माध्यम/ परवानगी चे वर्ष | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | लोक फाऊन्डेशन , लोक भारती कॉम्पलेक्स मरोल अंधेरी , मुंबई. | लोक नगर पब्लीक स्कूल ,अंबरनाथ (पूर्व ) जि. ठाणे | मराठी २००२-०३ | ८वी |
| २ | जयबजरंग शैक्षणिक व बहुउद्देशिय संस्था, जांभरुन ता. जि. वाशिम | वडद, ता. जि.हिंगोली. | मराठी २००३-०४ | ८वी |
| ३ | महात्मा फुले ग्रामीण विकास सेवाभावी संस्था , नांदेड | डोगरकोनाळी ता. जळकोट जि. नांदेड. | मराठी २००३-०४ | ८वी |
| ४ | विद्याभारती शैक्षणिक मंडळ अमरावती | चंद्रपूर (खल्लार) ता. दर्यापूर जि.अमरावती . | मराठी २००३-०४ | ८वी |
| ५ | भिमाशंकर ग्रामोदय संस्था, पिपळगांव (ब) ता. निफाड जि. नाशिक . | पिंपळगांव बसवंत ता. निफाड जि. नाशिक. | इंग्रजी २००३-०४ | ८वी |
| ६ | डायोसिस ऑफ औरंगाबाद | एम. आय. डी. सी. वाळूज | इंग्रजी २००३-०४ | ८वी |
| ७ | डायोसिस ऑफ औरंगाबाद | लासूर स्टेशन ता. गंगापूर जि. औरंगबाद. | इंग्रजी २००३-०४ | ८वी |
| ८ | हरदेवसिंग बाबा एज्युकेशन सोसायटी, इंद्रायणीनगर, भोसरी, पुणे | इंद्रायणीनगर, भोसरी , जि. पुणे. | इंग्रजी २००३-०४ | ८वी |
| ९ | भारतीय बुध्द धम्म ज्ञान विद्यालय (बिनाकी) नागपूर | बिनाकी लेआऊट जि. नागपूर. | मराठी. २०००-०४ | ८वी |

XXX( एकूण ९) XXXX

म.ा.श्री.०७३